# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७० वी बैठक दिनांक २७ मार्च २०१२

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७०वी बैठक दि. २७ मार्च २०१२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

१. मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष
२. मा. श्री. वल्लभ बेनके ... वि.स.स. व उपाध्यक्ष (मकृखोविम)
२. मा. इं. दे. प. शिर्के ... सचिव (लाक्षेवि) व सदस्य
३. इं. दी. रं. कंदी ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**विशेष निमंत्रित**

१. मा. श्री. आनंदराव पाटील ... मा. उपाध्यक्ष

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्री. संजय आघाव ... प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. शि. मा. उपासे ... मुख्य अभियंता (जसं), पुणे
२. इं. चं. आ. बिराजदार ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे
३. इं. अविनाश सुर्वे .... अ.अ., पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे
४. इं. अविनाश सुर्वे (अ.का.) .... अ.अ., पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे
५. इं. कि. भा. कुलकर्णी ... अ.अ. सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा
६. इं. ब. दा. तोंडे ... अ.अ. भीमा कालवा मंडळ, सोलापूर

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७० वी बैठक दिनांक २७ मार्च २०१२

**ठराव**

ठराव क्र. ७०/१

“नियामक मंडळाच्या ६८ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही.”

ठराव क्र. ७०/२

“ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत.”

ठराव क्र. ७०/३

“ठराव करण्यात येतो की, कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना व टेंभू उपसा सिंचन प्रकल्प यांना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध होत असल्याने सद्यस्थितीत या प्रकल्पांची कामे स्वबळावर करण्यासाठी कारखान्यांना देण्याचे प्रयोजन दिसत नाही. सबब या प्रकल्पांची कोणतीही कामे कारखान्यांना स्वबळावर देता येणार नसल्याचे संबंधित कारखान्यांस कळविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्रमांक ७०/४

“ठराव क्रमांक करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या दि. १६-०६-२००५ च्या बैठकीतील ठराव क्र. ४४/१० अन्वये श्री. दत्तात्रय रामचंद्र चव्हाण यांना भाडेपट्याने ३० वर्षाकरिता दिलेली खडकवासला धरणाच्या बॅक वॉटर व आय.ओ.टी. जवळचा रस्ता यामधील १७५२०/- चौ. मी. प्रथम वर्षी ₹ २.०० लक्ष. व त्यानंतर प्रत्येक वर्षी १० टक्के भाडेपट्टयामध्ये वाढ करुन करारनामा करण्यास मान्यता देण्यांत आली होती. परंतु भाडेपट्टयाने दिलेल्या जागेवर केंद्र सरकारच्या डी.आर.डी.ओ. अंतर्गत आय.ए.टी. ने सदर जागेवर नोटीफाईड केले असल्याने सदरच्या जागेचा संबंधितांस उपभोग घेता आला नसल्याने संबंधितांस दिलेली शासनाची जागा १७५२०/- चौ. मी. प्रथम शासनाकडे वर्ग करुन व संबंधितांने भरलेली वार्षिक भाडे ₹ २.०० लक्ष. व अनामत रक्कम ₹ २.०० लक्ष अशी एकूण ₹ ४.०० लक्ष. परत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”

**“मान्य”**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७० वी बैठक दिनांक २७ मार्च २०१२

ठराव क्रमांक ७०/५

“ठराव क्रमांक करण्यांत येतो की, नवीन मुठा उजवा कालवा कि. मी. २२ लगत पंपहाऊस करिता १५ x १० = १५० चौ. फुट भाडेपट्टयाने दिलेल्या जागेची मुदत संपुष्टात आली असल्याने सदरच्या जागेस कायदा सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार पुढील ५ वर्षाकरिता मुदतवाढ देणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”

ठराव क्र. ७०/६

“ठराव करण्यात येतो की, जत कालवा कि.मी. १० ते १३ मौजे ढालेवाडी व इरळी, ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली येथील ग्रामस्थांची घरे, विहिरी, फळबाग इत्यादींचे मूल्यांकनाची संभाव्य रक्कम ₹ १२.७१ लक्ष संबंधितांना अदा करणेसाठी यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्र. ७०/७

“ठराव करण्यात येतो की, पर्यटन खाते अथवा विकसकाकडून मागणी आल्यास कोल्हापूर येथील राजाराम तलाव सुशोभिकरण बांधा वापरा व हस्तांतरीत करा या शासनाच्या खाजगीकरणाच्या धोरणांतर्गत करण्यासाठी ना-हरकत-प्रमाणपत्र देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्र. ७०/८

“ठराव करण्यांत येतो की, मौजे लोणंद, ता. खंडाळा येथील गट नं. १८४ मधील ०.१८ हे. क्षेत्र थेट खरेदीने संपादीत करण्यासाठी व्यवहार्यता तपासून निश्चित करण्यात आलेली किंमत रु.५,७७,६६२/- ही खंडाळा परिसरातील प्रचलित शासकीय दर व बाजारभावापेक्षा कमी असल्याने सदर रक्कम अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. ”

ठराव क्र. ७०/९

“ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या ताब्यातील बारामती येथील वार्ड क्र.४, सि.स.नं.५९० मधील २८२९.५० चौ.मी. जागा वापरात नसल्याने व भविष्यात लागणार नसल्याने या जागेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून मागणी आल्यास जागेची शासकीय दराने ठरविलेली

**“मान्य”**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

₹ २१,२२,१२५/- ही रक्कम महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे”

ठराव क्र. ७०/१०

“ठराव करण्यांत येतो की, मौजे नालगांव, ता. परांडा, जि. उस्मानाबाद येथील बार्शी उपसा सिंचन योजनेच्या पंपगृहासाठी संपादित केलेले गट क्र.३४१ मधील ७.०३ हेक्टर क्षेत्र अतिरिक्त असल्याने व भविष्यात विभागास लागणार नसल्याने जिल्हाधिकारी यांचेकडून मागणी आल्यास ७.०३ हे. क्षेत्र जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”

ठराव क्र. ७०/११

“ठराव करण्यात येतो की, ताकारी उपसा योजना अंतर्गत टप्पा क्र.१ व २ मधील पंपांचे उच्च दाबाचे माहे जानेवारी-२०१२ ते जून-२०१२ अखेर वापरलेल्या व संभाव्य वीज देयकांची एकूण ₹ ३९२.३२ लक्ष इतकी रक्कम विद्युत देयके अदा करण्यासाठी टंचाई कार्यक्रमातून निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावा. सदर निधी प्राप्त होईपर्यंत विद्युत देयके उपलब्ध निधीमधून अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

विभागामार्फत होणाऱ्या सिंचनवसूली मधून योजनेच्या माहे जानेवारी-२०१२ ते जून-२०१२ अखेरच्या वीज देयकांची रक्कम समायोजित करण्यात यावी.”

ठराव क्र. ७०/१२

“ठराव करण्यात येतो की, म्हैसाळ उपसा योजना अंतर्गत टप्पा क्र.१ ते ५ मधील पंपांचे उच्च दाबाचे माहे जानेवारी-२०१२ ते जून-२०१२ अखेर वापरलेल्या व संभाव्य वीज देयकांची एकूण ₹ ६८६.२६ लक्ष इतकी रक्कम विद्युत देयके अदा करण्यासाठी टंचाई कार्यक्रमातून निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावा. सदर निधी प्राप्त होईपर्यंत विद्युत देयके उपलब्ध निधीमधून अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

विभागामार्फत होणाऱ्या सिंचन वसूलीमधून योजनेच्या माहे जानेवारी-२०१२ ते जून-२०१२ अखेरच्या वीज देयकांची रक्कम समायोजित करण्यात यावी.”

**“मान्य”**

**सही/-**
**(इंजि. दीपक रं. कंदी)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७० वी बैठक दिनांक २७ मार्च २०१२

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय

ठराव क्र. ७०/१३

"ठराव करण्यात येतो की, तारळी प्रकल्पांतर्गत कोपर्डे पोहोच कालव्याच्या भूसंपादनास गेल्या तीन वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी यांचा तीव्र विरोध लक्षात घेता व प्रकल्पाचे अे.आय.बी.पी. अंतर्गत खटाव व माण तालुक्यातील ८८७६ हे. सिंचन क्षमता निर्मिती होऊन उद्दिष्ट साध्य होण्यासाठी उघड्या कालव्याऐवजी बंदिस्त पाईपलाईन व बोगदा करुन सदरचा बदल चालू असलेल्या कामातील तांत्रिक बदल असल्याने प्रस्तावित बदलासह काम कोपर्डे कालव्याच्या चालू निविदेअंतर्गत करुन घेण्याच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

१. उपरोक्त कामाच्या अंदाजपत्राकास सक्षम स्तरावर मान्यता घेण्यात यावी.

२. सदर बाबीचा सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावास समावेश करुन त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर काम हाती घेण्यात यावे."

ठराव क्र. ७०/१४

"ठराव करण्यात येतो की जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचे कालवे खडकाळ व जास्त पाझरणा-या भूस्तरातून जातात त्यामुळे जास्त पाणीगळती होऊन पाण्याचा अपव्यय होतो. उपसा सिंचन योजनेचे पाणी वीज देयकामुळे महाग असल्याने ते किंमती आहे. पाण्याची गळती थांबवून देखभाल दुरुस्तीचा व विजेचा खर्च कमी करण्यासाठी तसेच कालव्याच्या पूच्छ भागास अपेक्षित विसर्ग प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालवे व वितरण व्यवस्थेला कॉक्रींट अस्तरीकरण करण्यास "खास बाब" म्हणून खालल अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अटीः

१. शासन परिपत्रक दि. १५.०१.२०१० नुसार सदर बदलास सक्षम स्तरावर मान्यता घेण्यात यावी.
२. सदर प्रस्तावाच्या आर्थिक दायित्वास मा. अध्यक्ष यांची मान्यता घ्यावी.
३. सदर प्रस्तावाचा अंतर्भाव करुन प्रकल्पास पुनःश्च सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७० वी बैठक दिनांक २७ मार्च २०१२

ठराव क्र. ७०/१५

"ठराव करण्यात येतो की, डिंभे धरणाच्या खालील बाजूस असलेली महामंडळाच्या ताब्यातील १५ हे. मोकळी जागा भिमाशंकर पर्यटन उद्यान विकसित करणेसाठी पर्यटन व सांस्कृतिक

कार्यविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडून ठेव अंशदान पध्दतीने उपलब्ध होणाऱ्या निधीतून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचे मार्फत काम होणार असल्याने डिंभे बु. ता.आंबेगांव जि. पुणे, येथील सर्वे नंबर ५,६,११३ ते १२५, १३२ ते १३४, १५९ ते १६१, क्षेत्र १०.१० हेक्टर व सर्वे नंबर १३, १५, १४० ते १४३ व १६१ रस्त्याचे उजव्या बाजूकडील क्षेत्र ५.८९ असे एकूण १५.९९ हेक्टर क्षेत्रापैकी रस्त्याचे क्षेत्र ०.९९ हेक्टर वगळून १५.०० हे. क्षेत्रावर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचा हक्क अबाधित राहून भिमाशंकर पर्यटन उद्यान विकसित करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ७०/१६

"ठराव करण्यात येतो की, हडपसर येथील मोकळ्या जागेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून मागणी आल्यास पुढील कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ७०/१७

"ठराव करण्यात येतो की, लघु पाटबंधारे तलाव आंबेवाडी ता.चंदगड,जि.कोल्हापूर प्रकल्पांतर्गत बुडित क्षेत्रातील संपादित जमिनीमधील विहीरींचा मोबदला आणि निवाडा जाहीर तारीख व प्रत्यक्ष मोबदला वाटप तारीख या दरम्यानच्या कालावधीतील व्याजाची रक्कम रु.१,०५,१९२/- संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ७०/१८

"ठराव करण्यात येतो की, शासन (महसूल व वनविभाग) निर्णय दि.१३/१०/२०११ अन्वये नियुक्त केलेल्या समितीच्या निर्णयाप्रमाणे जमीनीचा मोबदला दर, त्यानुसार येणारी रक्कम निश्चित करण्यास व लोक अदालतीमध्ये तडजोड करुन शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७० वी बैठक दिनांक २७ मार्च २०१२

ठराव क्र. ७०/१९

"ठराव करण्यात येतो की, वाकुर्डे उपसा सिंचन योजनेच्या भाग-२ अंतर्गतच्या लाभक्षेत्रामध्ये यापूर्वी वारणा प्रकल्पाच्या बाबतीत अनुभवास आलेली, भूसंपादनाची प्रमुख अडचण विचारात घेता सदर क्षेत्रासाठी उघड्या कालव्यांद्वारे वितरण व्यवस्था राबविण्याऐवजी बंद नलिकांद्वारे वितरण व्यवस्था राबविल्यास पाण्याचा वापरामध्ये, वीजेच्या वापरामध्ये व पर्यायाने वीज देयकांच्या खर्चामध्ये लक्षणिय बचत होणार आहे. तसेच बंद नलिकांद्वारे वितरण व्यवस्था राबविणे क्षेत्रिय स्तरावर तांत्रिकदृष्ट्या सुलभ होणार आहे. यासाठी उपरोक्त विवेचन विचारात घेता बंद नलिकांद्वारे वितरण व्यवस्था राबविण्याच्या पर्यायास खालील अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

अटीः

१) उपरोक्त तांत्रिक बदलास सक्षम स्तरावर मान्यात घेण्यात यावी.
२) सदर बाबींचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात समावेश करुन त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर काम हाती घेण्यात यावे.

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

OOOOOO

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मंत्री,जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |